# सेवक वार्ता


**मे - २०२१** **वर्ष -२, अंक - ७**

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे | कार्यालय - ब-८, सारस नगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे - २


## सेवक संघ कामाबाबत

### बांबू फुलोरा पश्चात कामांचा आराखडा तयार करण्याचे कामाची सद्यस्थिती

सेवक संघ महाराष्ट्र शाखेला ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील बांबू फुलोरा पश्चात निष्कासन व इतर काही कामांचा आराखडा तयार करण्याचे काम सेवक संघास मिळाले आहे व त्या संदर्भात श्री पत्की सरांचे मार्गदर्शनाखाली समझोता अभिलेख चंद्रपूर येथे स्वाक्षरीत केला आहे. या आराखडा तयार करण्याचे कामासाठी सर्वश्री. विश्वास सावरकर, संजय जगताप, संभाजी गवळी, अजय पिलारीसेट यांचा चमू कार्यरत आहे. चंद्रपूर येथील श्री. विजय खनके हे स्थानिक पातळीवर समन्वयक म्हणून सहाय्य करत आहेत. या चमूतील सर्वश्री. संजय जगताप, संभाजी गवळी, विजय खनके यांनी मार्च-२१ मध्ये श्री.पत्की सरांचे मार्गदर्शनाखाली तीन दिवस ताडोबा व्याघ्र प्रकल्पात दौरा केला, क्षेत्रीय पाहणी केली. वन संरक्षक व क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांचेशी चर्चा केली. माहिती संकलित केली. तद्नंतर, तीन कामांचे प्रारूप आराखडे मा. वन संरक्षक व क्षेत्र संचालक यांना अभिप्राय व सुचनांसाठी सादर केले असून, उत्तर प्रतिक्षित आहे. या संदर्भात चमूतील सदस्यांशी मा. वन संरक्षक व क्षेत्र संचालक यांचेशी गुगल मीटवर आभासी सभेत चर्चा करण्यात आली. आराखड्यास अंतिम रूप देण्यासाठी चंद्रपूर येथे चालू मे महिन्यात दौरा प्रस्तावित केला होता. परंतु, कोरोना महामारीच्या संदर्भात शासन व स्थानिक प्रशासनाकडून वेळोवेळी जाहीर झालेले निर्बंध पहाता विविध ठिकाणाहून आपल्या चमूस चंद्रपूर येथे जाण्यास निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता व सुरक्षितेच्या दृष्टीने या महिन्यात प्रस्तावित दौरा स्थगित करण्यात आला आहे. शक्य असल्यास जून महिन्यात हा दौरा आयोजित करण्यात येईल.



या अंकात . . . . .


सेवक संघ कामाबाबत . . १
नवीन आजीवन सदस्य . . . १
कोरोना वार्ता.. . . . . २
सदस्य वार्ता . . . २
सेवक शाखांचे बळकटीकरण ..२
सुंदरलाल बहुगुणा यांचे निधन .२
पुस्तक परिक्षण . . . . २


### नवीन आजीवन सदस्य

सेवक संघ धुळे शाखेत ५ खालीस आजीवन सदस्यांची नोंदणी झाली.

१) श्री.पी.आर. पाटील, सेनि विवअ
२) श्री.एन.आर.निकम, सेनि सवसं
३) श्री.बी.बी. निकम, सेनि वनक्षेत्रपाल
४) श्री. एन. एन. वाघ, सेनि वनपाल
५) श्री. आर.बी. भवरे, सेनि वनपाल

### विशेष वृत्त

बांबू फुलोरा पश्चात निष्कासन व इतर काही कामांचा व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी गठित चमूमध्ये GIS कुशल सदस्यांचा समावेश .

सेवानिवृत्त सहाय्यक वन संरक्षक श्री एस.व्ही.कुंभकर्ण यांचे बांबू फुलोरा पश्चात निष्कासन व इतर काही कामांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी गठित चमूमध्ये समावेश करणेत आला आहे. श्री. कुंभकर्ण हे GIS संबंधात अनुभवी आहेत. त्यांनी कार्य आयोजनाशाखेत धुळे येथे कार्यरत असताना QGIS, Geo media, ArchGIS असे विविध सॉफ्टवेअर वापरून काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा सेवक संघाला निश्चित होईल अशी आशा आहे. त्यांचे सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र मध्ये सहर्ष स्वागत आहे.

### सेवकसंघ शाखांचे बळकटीकरण

सेवक संघ महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री शिरीष अस्थाना यांनी मागील कार्यकारी समितीच्या सभेत सेवक संघाच्या विविध शाखापैकी ज्या शाखा मोठ्या प्रमाणात चांगले काम करत आले आहेत त्या शाखांचे बळकटीकरण करण्याचा मनोदय व्यक्त केला.त्या अनुषंगाने धुळे व अमरावती वन वृत्तात कार्यरत असलेल्या सेवक संघ शाखांना कार्यालयीन कामासाठी लॅपटॉप व काही फर्निचर साहित्य देण्याचा मनोदय व्यक्त केला. त्याबाबत लवकरच अंतिम रूप दिले जाईल.

### सुंदरलाल वहुगुणा यांचे निधन

चिपको चळवळ करून देशातील जनमानसात निसर्ग संवर्धनाची मोठ्या प्रमाणात प्रेरणा देणारे सुंदरलाल बहुगुणा यांचे दिनांक २१ मे २०२१ रोजी ऋषिकेश येथे कोरोनामुळे निधन झाले. सेवक संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

### कोरोना वार्ता

१. सेवक संघाच्या कामांवर कोरोना साथीच्या रोगाचा मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असून अनेक सुरु व प्रस्तावित असलेली कामे स्थगित करावी लागली आहेत. त्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बांबू फुलोरा पश्चात बांबू निष्कासन व इतर कामाचे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, अमरावती शाखेतर्फे निर्मित कै. विजय भोसले यांच्या लेखांचे "वृक्षधन" हे पुस्तक प्रकाशन ही प्रमुख कामे आहेत.
सर्व सदस्यांनी स्वतसह आपल्या कुटुंबियांची काळजी घ्यावी व सुरक्षित राहावे.

### पुस्तक परिक्षण

'A Guide for Planning Wildlife Management in Protected Areas and Managed Landscapes' अशा शीर्षकाचे श्री. विश्वास सावरकर , भा.व.से. (निवृत्त निदेशक भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादून) लिखित हे पुस्तक वन्यजीव संवर्धनासाठी उपयुक्त आहे.राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये व राखीव वन क्षेत्रांतील वन्यजीवांच्या आयोजन--साठी भारतातील हे एकमेव गाईड आहे. देहरादून येथील भारतीय वन्यजीव संस्थान व नटराज पब्लिशर्स, देहरादून ह्यांनी ते २००५ मध्ये प्रकाशित केले आहे. पर्यावरणाच्या घटकांमध्ये होणारे नैसर्गिक व अनैसर्गिक बदल व मानवाच्या प्रक्रियांमुळे जैविक विविधतेवर होणारे घातक परिणाम लक्षात घेऊन,स्थानिक नागरिकांच्या सहभागाने वन्यजीवांचे संरक्षण व त्यांच्या भविष्य काळासाठी आयोजन कसे साकारता येतील, असे उद्देश व विचार अद्ययावत वैज्ञानिक नियम व कार्यपद्धतीला वास्तवाची जोड साधून ह्या पुस्तकात मांडले आहेत.वन विभागाची संसाधने, समस्या, जरूर त्या आर्थिक आधाराचा अभाव व दीड शतकापूर्वी पासून थोड्याफार फरकाने चालत येणारे वन व्यवस्थापनांतरु जलेले पारंपारिक समज व दृष्टीकोन अशी एक ना अनेक आव्हाने लक्षात घेतलेली आहेत. क्षेत्रीय वन विभागातील वनांच्या नैसर्गिक पुनरुज्जीवनासाठी आवश्यक असणारी परिस्थिती कायम राखणे हे वर्किंग प्लॅनचे प्रमुख उद्दिष्ट आहे व ते साधण्यासाठी जैविक विविधतेच्या संवर्धनाची जरूर ती आयोजित काळजी घेणे अपरिहार्य आहे परंतु वर्किंग प्लॅनमध्ये अशा आयोजनेची अनुपस्थिती आहे. ही त्रुटी भरून काढण्याठी ह्या गाईड मध्ये तपशीलवार उहापोह केला आहे.असे आयोजन नॅशनल वर्किंग प्लॅन कोड- २०१४प्रमाणे यथोचित आहे. ह्या खेरीज इको टूरीझम, नेचर इंटरप्रिटेशन, कॉन्झरवेशन एज्युकेशन,इकोडेव्हलपमेंट, रिसर्च, मॉनिटरिंग, प्रशिक्षणाची सुधारणा अशा उद्दिष्टांच्या प्रक्रियेवर भर दिला आहे. ह्या व्यतिरिक्त मॅनपावर प्लॅनिंग, बजेट, शेड्यूल ऑफ ऑपरेशन्स इत्यादी हे ओघाने आलेच अशा अयोजानेला पूरक अशी विस्तृत माहिती देखील ह्या गाईड मध्ये आहे. हे गाईड भारतातील अनेक राज्यांमध्ये वापरले जात आहे. श्री. विश्वास सावरकर सेवक संघाचे जेष्ठ सदस्य आहेत.

प्रकाशक - नटराज पब्लिशर्स, राजपूर रोड, देहरादून-२४८००१
मूल्य - रू. ६९५/-

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी